दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे  PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224  इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर  कार्यकारी संपादक : विद्या जाधव  उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 225, Marathi Daily Tuesday, Date - 03 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २२५ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. ०३ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४




पाहिजेत
महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.
अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३
संपर्क - 9168567111
वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# ‘हिंदुभूषण’ अंधारात का? जनतेतून संतापाची लाट

## ७० कोटी रूपये खर्च करून उभारण्यात आलेला छत्रपती संभाजी राजांचा पुतळा अजुनही अंधारातच...

**पिंपरी । विकास साळवे**

७० कोटी रूपये खर्च करून उभारण्यात आलेला धर्मविर छत्रपती संभाजी राजांचा पुतळा मात्र अजुनही अंधारातच आहे. छत्रपती संभाजी राजांना हिंदुभुषण अर्थात 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभुषण' म्हणून थाटामाटात ३५०० ढोल ताशांच्या पथकात राजांचा दुग्धाभिषेक करण्यात आला. पिंपरी चिंचवडमध्ये बोराडेवाडी मोशी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा १०० फूट उंच पुतळा उभारण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने बोराडेवाडी मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वात उंच पुतळा व स्मारक म्हणुन त्यांचा उल्लेख व्हावा या हेतुनेच हा १०० फुटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या तर या पुतळ्यासाठी लागणारा चबुतरा हा ४० फूट उंचीचा बनवण्यात आला आहे.



भोसरी विधानसभा क्षेत्राचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने छत्रपती संभाजी महाराजांचे हे स्मारक जगातील सर्वात उंच ७० कोटी रूपये खर्च करून महानगर पालिकेच्यावतीने उभारण्यात आलेला हा पुतळा तथा स्मारक असून हेच स्मारक तथा छत्रपती संभाजी राजांचा पुतळा मात्र अजुनही अंधारातच आहे. अंधारात असलेल्या राजांची ही विटंबना तथा अवमान नव्हे काय ?

असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.तसेच कित्येक महीण्यापासून हा पुतळा अंधारात असून त्यांच्या अवतीभोवती लाईटची व्यवस्था करून त्याठिकाणी सुरक्षा रक्षकांची नेमणुक कराया हवी होती.परंतू येथे ना लाईट आहे ना सुरक्षा रक्षक. उलट या पुतळ्याचे अजुन कित्येक महणे उलटून गेले तरी उदघाटनही झालेले दिसत नाही.एवढा मोठा कोट्यावधीचा खर्च करून उभारलेला हा पुतळा उदघाटनाविना अंधारात का आहे याचे कोडे मात्र सामान्य जनतेला उलगडलेले नाही.परंतू एक गोष्ट मात्र नक्की की,आजही सुरक्षेविना अंधारातच उदघाटनाची वाट पहात हा पुतळा दिमाखात उभा आहे.

## थोडक्यात...

### अभियांत्रिकी व वैद्यकीय परीक्षांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत कोचिंगची संधी

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर आणि बीड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि सीईटी या परीक्षांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. शासकीय वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात आदिवासी विद्यार्थ्यांचा टक्का वाढवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी हे पाऊल उचलले आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आता नामवंत खासगी संस्थांमार्फत अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि सीईटी या परीक्षांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात येत आहे. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित शाळा, एचटड आणि जिल्हा परिषद शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज तातडीने भरणे आवश्यक आहे. हे अर्ज प्रकल्प कार्यालय किंवा संबंधित मुख्याध्यापकांकडे मोफत उपलब्ध असून ते भरून तात्काळ सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### मित्रांकडून १४ वर्षीय मुलाची हत्या

**मुंबई । प्रतिनिधी**

आठवीत शिकणाऱ्या १४ वर्षीय मुलाची त्याच्याच मित्रांनी मारहाण करून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हत्या केल्यानंतर पुरावा लपवण्यासाठी मृतदेह तलावात फेकून तो बुडाल्याचा बनाव करण्यात आल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी भांडूप पोलिसांनी १४ ते १५ वयोगटातील तिघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

मृत मुलाचे नाव सिद्धार्थ अजय लोंढे (वय १४) असे असून तो भांडुप पश्चिमेतील तुळशेटपाडा परिसरात कुटुंबासोबत राहत होता. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे ३ वाजता तो खेळायला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला; मात्र रात्री उशिरापर्यंत परतला नाही. कुटुंबीयांनी शोधाशोध करूनही काहीच माहिती न मिळाल्याने आईने पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. अल्पवयीन मुलगा बेपत्ता असल्याने पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. दरम्यान, प्राथमिक चौकशीत सिद्धार्थ नेहमी मित्रांवर दादागिरी करत असल्याने काही मित्रांनी त्याला धडा शिकवण्याचे ठरवले होते. त्यानुसार त्याला विहार तलाव परिसरात नेऊन मारहाण करण्यात आली. मारहाणी दरम्यान त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर घाबरलेल्या मुलांनी मृतदेह तलावात फेकून तो पाण्यात बुडाल्याचा बनाव करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी सुमारे ५ वाजता विहार तलावात एक मृतदेह आढळला. अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून तो शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालय येथे पाठवण्यात आला. शवविच्छेदन अहवालात डोक्यावर गंभीर जखमा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी संशयित मित्रांची चौकशी केली. चौकशीदरम्यान एका मुलाने गुन्ह्याची कबुली दिली आणि आणखी दोन मित्रांचा सहभाग असल्याचे सांगितले.

# महिलांसाठी मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न

**मुळशी । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील माण ग्रामपंचायत कार्यालयात शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत महिलांसाठी एकदिवसीय मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले.

हे शिबिर एस. एन. बी. पी. विधी महाविद्यालय, मोरवाडी, पिंपरी यांच्या लीगल एड सेलच्या वतीने तसेच पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे व पिंपरी चिंचवड ड्व्होकेट्स बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे आयोजन मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये महिलांचे सक्षमीकरण व कायदेशीर हक्क, बालकांचे हक्क व बालसंरक्षण कायदे, सायबर गुन्हे व त्यावरील उपाययोजना, जमिनीचे हक्क व



जमीनविषयक वाद, फौजदारी कायदे तसेच मोफत विधी सहाय्य यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या सर्व विषयांवर कायदेशीर लघुनाटिक अतिशय उत्कृष्टरित्या सादर करून कायद्याविषयी जनजागृती केली व सर्वांची मने जिंकली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. एस. एस. मोहिते (दिवाणी न्यायाधीश व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पौड न्यायालय), मा. श्रीमती पी. डी. पाटील (दिवाणी न्यायाधीश व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी न्यायालय) उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून मा. श्री. सुधीर भागवत (गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुळशी), ड. प्रीतीसिंग परदेशी (उपाध्यक्ष, पुणे ड्व्होकेट बार असोसिएशन), ड. भारती पुरोहित व ड. राजेश कातोरे (मुंबई उच्च न्यायालय) यांचीही उपस्थिती लाभली. मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रोहिणी जगताप मॅडम यांनी केले.

संस्थेचे संस्थापक डॉ. डी. के. भोसले, अध्यक्षा डॉ. वृषाली भोसले, संचालिका ड. डॉ. ऋतुजा भोसले, मा. देवयानी भोसले तसेच प्राचार्या डॉ. रोहिणी जगताप यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थीवर्ग, ग्रामस्थ महिला, महिला बचत गट तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उपस्थितांना कायदेशीर सल्ला देण्यात आला व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्याच्या दृष्टीने हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. हे शिबिर यशस्वी होण्याकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर वर्ग , विद्यार्थीवर्ग तसेच ग्रामसेवक अधिकारी, माण आणि ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पदव्युत्तर पदवीचा विद्यार्थी सुनील लोखंडे याने केले तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या विधी कक्ष सहाय्य अधिकारी सहा. प्रा. नीलिमा फोकमारे - पाटील यांनी केले.

# नाशिकमध्ये विक्री-विवाह रॅकेटचा पर्दाफाश

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमध्ये मुलींच्या अपहरणाच्या घटना वाढत असतानाच सातपूर पोलीस ठाणे हद्दीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अवघ्या तीन-चार महिन्यांच्या तान्ह्या बाळाची आई आणि पतीपासून विभक्त असलेल्या महिलेची ‘इव्हेंट मॅनेजमेंट’मध्ये नोकरी देण्याच्या बहाण्याने दोन लाख रुपयांत विक्री करण्यात आल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथे तिचा जबरदस्तीने विवाह लावण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

सातपूरच्या कार्बन नाका परिसरात राहणाऱ्या पीडित महिलेला २७ फेब्रुवारी रोजी राणी आणि भागी नावाच्या दोन महिला एजंटांनी संपर्क साधला. इव्हेंटचे चांगले काम मिळवून देतो, असे सांगत तिला विश्वासात घेतले. त्यानंतर कारमधून तिला मालेगावमार्गे थेट नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथे नेण्यात आले. तेथे नवनाथ खिरडकर नावाच्या तरुणाकडून दोन लाख रुपये घेत पीडितेच्या इच्छेविरुद्ध तिचा जबरदस्तीने विवाह लावण्यात आल्याचा आरोप आहे. एका रात्रीत आयुष्य उद्ध्वस्त झाल्याची जाणीव झालेल्या पीडितेने २८ फेब्रुवारी रोजी कसाबसा मोबाईलवरून आईशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार सांगितला. पीडितेच्या पालकांनी तातडीने सातपूर पोलीस ठाणे गाठले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांचे पथक लगेच जातेगावकडे रवाना झाले. तेथे सुमारे ३०० ग्रामस्थांचा जमाव होता. तणावपूर्ण वातावरणात पोलिसांनी धाडसाने कारवाई करत पीडितेची सुखरूप सुटका केली.

# पिंपरी-चिंचवडच्या वीज प्रश्नावर विधानसभेत आमदार शंकर जगताप आक्रमक; शासनाचे 'लक्ष' वेधले!

### दृष्टीक्षेपात


- आरडीएसएस आणि एनपीएसएएस अंतर्गत पिंपरी चिंचवडच्या विद्युत व्यवस्थेचा दर्जा वाढ करण्याकरता निधी उपलब्ध होणार
- ताथवडे उपकेंद्राच्या प्रलंबित प्रस्तावांवरून सरकारचे कठोर कारवाईचे आदेश; पुण्यात बैठक घेऊन प्रलंबित कामांचा आढावा घेणार
- राज्य सरकारकडून पुणे जिल्हयासाठी पुनर्गठित वितरण क्षेत्र योजनेतून ११०० कोटी रुपयांच्या आराखड्याला मिळणार गती

**मुंबई । प्रतिनिधी**

वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक गरजांनुसार पिंपरी-चिंचवड शहराच्या वीज यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकारकडून पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) अंतर्गत ११०० कोटी रुपयांच्या आराखड्याला गती देण्यात येणार आहे.दरम्यान,दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ताथवडे उपकेंद्राच्या प्रस्तावावरून आमदार शंकर जगताप यांनी आक्रमक पवित्रा घेतला असता,विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन ऊर्जा राज्यमंत्री मा. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहे.



आमदार शंकर जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे पिंपरी-चिंचवड आणि भोसरी परिसरातील वीज समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.यावेळी आमदार जगताप म्हणाले,पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून २०५१ पर्यंत ती ९३ लाखांच्या घरात जाण्याची शक्यता आहे.चिंचवड मतदार संघालगत आयटीपार्क जवळ असल्यामुळे रावेत,किवळे,मामुर्डी,वाकड ,ताथवडे आणि पिंपळे सौदागर या भागांत 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्यांची संख्या मोठी आहे.मात्र, पायाभूत सुविधा कमकुवत असल्याने वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारांना नागरिक कंटाळले आहेत.



चिंचवड मतदारसंघात महावितरणाचे पिंपरी व भोसरी हे दोन विभाग असून त्यामध्ये हिंजवडी वाकडसारखा आयटी पार्कचा समावेश आहे.शहराच्या वाढत्या विस्तारीकरणात किवळे मामुर्डी,रावेत,पुनावळे, ताथवडे या भागाचा वाढते विस्तारीकरण लक्षात घेता महावितरणच्या विभागाच्या वतीने पुरवण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, भूमिगत केबल, ट्रान्सफॉर्मर,फीडर,उच्च दाबाचे उपकेंद्र,पावर ट्रान्सफॉर्मर बसवण्याची गरज आहे.औद्योगिक व्यावसायिक आस्थापना व नागरिकांना अखंड वीज पुरवठा करण्याकरता कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी यावेळी आमदार जगताप यांनी केली.विद्युत वाहिन्यांवरील लोड अधिक असल्यामुळे तांत्रिक बिघाड,देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये विलंब, वीज पुरवठ्याची सात्यतता,गुणवत्ता यामध्ये त्रुटी इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने फोरम ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज यांच्यावतीने वारंवार तक्रारी येतात.त्या अनुषंगाने महावितरणाच्या भोसरी व पिंपरी विभागातील दर्जावाढ करणे,शहरातील वीज ग्राहकांना चांगली सेवा देण्याकरिता पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) अंतर्गत १९२ कोटीचा प्रस्ताव व नागपूर पुणे स्पेशल असिस्टंट स्कीम (एनपीएसएएस ) योजनेअंतर्गत १५६ कोटीचा शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत आमदार जगताप यांनी शासनाचे लक्ष वेधले.

सभागृहात शासनाचे लक्ष वेधताना आमदार शंकर जगताप म्हणाले,मोशी,चऱ्होली आणि ताथवडे येथे अतिउच्चदाब (एक्त) उपकेंद्रे उभारणार,वाढत्या ग्राहक संख्येनुसार काळेवाडी,हिंजवडी आणि बिजलीनगर या शाखांचे विभाजन करून नवीन कार्यालये सुरू करणे.भोसरी येथील 'सेंच्युरी इंका' उपकेंद्रामध्ये दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवणे.भोसरी विधानसभा मतदारसंघातील ओव्हरहेड वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करण्याची मागणी जगताप यांनी केली. आमदारांच्या प्रश्नांना उत्तर देताना ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या,पिंपरी-चिंचवडच्या वीज आराखड्यासाठी आरडीएसएस (ठऊडड) आणि इतर योजनांमधून निधीची तरतूद केली आहे. पुणे जिल्हयासाठी ११०० कोटींचा प्रस्ताव असून,त्यातून पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी ३५० कोटी पिंपरी-चिंचवडसाठी आहेत.ताथवडे उपकेंद्राचा प्रस्ताव महापारेषणकडे दीड वर्षांपासून का प्रलंबित आहे,याची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.पुण्यातील सर्व लोकप्रतिनिधींसोबत लवकरच पुण्यात बैठक घेऊन या सर्व प्रलंबित कामांचा आढावा घेतला जाईल.

> पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, आयटी हब आणि वाढत्या नागरीकरणामुळे विजेची मागणी प्रचंड वाढली आहे. मात्र,वीज यंत्रणेच्या पायाभूत सुविधा कमकुवत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतोय.ताथवडे उपकेंद्रासारखे महत्त्वाचे प्रस्ताव मार्गी लागणे गरजेचे आहे.या प्रलंबित प्रस्तावांना तात्काळ मंजुरी मिळवून देणे आणि नवीन शाखा कार्यालयांच्या माध्यमातून ग्राहकांना गतीने सेवा देणे ही आमची प्राथमिकता आहे. या प्रश्नांवर शासन स्तरावर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन मिळाले असून,लवकरच पुण्यात होणाऱ्या विशेष बैठकीत याचा पाठपुरावा केला जाईल. राज्य सरकारकडून पुणे जिल्हयासाठी पुनर्गठित वितरण क्षेत्र योजनेतून ११०० कोटी रुपयांच्या आराखड्याला गती मिळणार आहे.यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड सह या भागातील औद्योगिक व निवासी ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.यातून वीज पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.
>
> **- शंकर जगताप**
> आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

# संपादकीय...

## हिंदुभूषण पुतळा अंधारात

पिंपरी-चिंचवडमधील बोराडेवाडी, मोशी येथे उभारण्यात आलेला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फूट उंच पुतळा 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' म्हणून मोठ्या थाटामाटात साकारला गेला. सुमारे ७० कोटी रुपये खर्चून, ४० फूट उंच चबुतऱ्यावर उभारलेले हे भव्य स्मारक म्हणजे मराठी अस्मिता आणि शौर्याचे प्रतीक ठरावे, अशी अपेक्षा होती. ३५०० ढोल-ताशांच्या गजरात दुग्धाभिषेक करून ज्या उत्साहात या पुतळ्याचे लोकार्पण साजरे करण्यात आले, तोच उत्साह आज त्याच्या देखभालीत आणि व्यवस्थापनात का दिसत नाही, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. आज स्थिती अशी आहे की, कोट्यवधींचा खर्च करून उभारलेले हे स्मारक अंधारात उभे आहे. परिसरात प्रकाशयोजनेचा अभाव, सुरक्षारक्षकांची अनुपस्थिती आणि उद्घाटनाची अनिश्चितता यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. स्मारक हे केवळ उभारण्यापुरते नसते; त्याची निगा, सुरक्षा आणि सन्मान ही तितकीच महत्त्वाची जबाबदारी असते. अन्यथा भव्यतेचा सारा आविष्कार केवळ दिखाऊपणात परिवर्तित होतो. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामागे 'जगातील सर्वात उंच पुतळा' अशी ओळख निर्माण करण्याचा हेतू होता. मात्र, केवळ उंची आणि खर्च यावर स्मारकाची प्रतिष्ठा ठरत नाही; तर त्या ठिकाणी असलेली व्यवस्था, नियोजन आणि सातत्यपूर्ण देखभाल यावरच त्याचे खरे मूल्य अवलंबून असते. प्रकाशयोजना आणि सुरक्षेअभावी हे स्मारक रात्रीच्या अंधारात हरवून जाते, ही वस्तुस्थिती खेदजनक आहे. भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून उभारलेले हे स्मारक अभिमानाचे प्रतीक व्हावे, हीच सर्वांची अपेक्षा आहे. परंतु आज नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे की, एवढ्या मोठ्या खर्चानंतरही उद्घाटन प्रलंबित का? आवश्यक सुविधा का उपलब्ध करून दिल्या जात नाहीत? प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व हे पराक्रम, त्याग आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. अशा महान राजांच्या स्मारकाभोवती दुर्लक्षाचे सावट राहणे योग्य नाही. स्मारक अंधारात उभे असणे ही केवळ व्यवस्थेची चूक नाही, तर जनभावनेला धक्का देणारी बाब आहे. त्यामुळे प्रकाशयोजना, सुरक्षा व्यवस्था आणि अधिकृत उद्घाटन याबाबत त्वरित निर्णय घेऊन या स्मारकाला साजेसा सन्मान मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आजही तो पुतळा दिमाखात उभा आहे, उद्घाटनाची आणि योग्य व्यवस्थेची वाट पाहत. प्रश्न एवढाच-इतिहास घडविणाऱ्या राजांच्या स्मारकाकडे वर्तमान काळ इतक्या अंधारातून का पाहत आहे?

जाहिर प्रगटन
फक्त 300 रुपयात
दैनिक महिला संवाद मध्ये छोट्या जाहिराती
आणि पॅनल जाहिराती अगदी स्वस्तात छापून मिळतील.
जाहीर प्रगटन, पाहिजेत, जन्मतारीख बदल, नावात बदल,
मालमत्ता हस्तांतरण, खरेदी-विक्री व स्वरुपाच्या यासहित छोट्या
जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिध्द केल्या जातील..
इच्छुकांनी आजच
या नंबरवर संपर्क साधावा.
9168567111

# कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सुधारणावादी परंपरेत १९०५ ते १९५६ असे सतत पाच दशके ज्यांनी समाज सुधारणा घडवून आणल्या, त्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जयंती (दि. २३ फेब्रुवारी). भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र,गरीब मुला -मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, दिव्यांगांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी -मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दुःखी व हतबल असणाऱ्यांना हिम्मत देण्याची आचरण सूत्री सांगून त्यालाच रोकडा धर्म म्हणणारे गाडगेबाबा आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वातही समाजाचा आरसा बनून मार्गदर्शन करत आहे. गाडगेबाबा म्हणजे भारतीय समाजसुधारणेतील आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व.वैराग्याचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे गाडगेबाबा. लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगेबाबा. अंधश्रद्धेवर थेट प्रहार म्हणजे गाडगेबाबा. दिव्यांगांचा, निराश्रीतांचा बाप म्हणजे गाडगेबाबा. जातीभेदांवर प्रहार म्हणजे गाडगेबाबा.हिंसात्मक कुळधर्मांना, नवसाला हद्दपार करणारा कर्मयोगी म्हणजे गाडगेबाबा. मुक्या प्राण्यांच्या बळी प्रथेविरुद्धचा प्रबोधनकार म्हणजे गाडगे बाबा.थोडक्यात त्यांच्या जीवनाचे ध्येय सर्वसामान्यांचे कल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि देवधर्माच्या अंध फेऱ्यात अडकून पडलेल्या समाजाला मानवतेचा श्रेष्ठ आदर्श घालणे होते.

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. लहानपणी त्यांना डेबू म्हणत. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते.आडनाव जानोरकर.लहानपणीच व्यसनाधीनतेने वडिलांचे निधन झाल्यामुळे ते आपल्या आईसोबतअकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे या गावी मामाकडे राहायला गेले. त्यांच्या जीवनातील प्रारंभिक काळातील संघर्षांनी,कुप्रथांनी व त्यातून आलेल्या दुःखांनी त्यांच्या मनात समाजसेवेचा आणि दीन-दुखितांच्या मदतीचे बीज रुजवले. शेती,माती,संसारामध्ये रमलेल्या डेबुजींना तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा व कुप्रथांनी समाजासाठी लढण्यास प्रवृत्त केले. १९०५ नंतर त्यांनी कुटुंब आणि संसार त्यागून गावोगावी फिरून लोकांना समाजातील दोष समजावून सांगण्याचा निर्णय घेतला.केवळ महाराष्ट्रच नाहीत तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यातही त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.

त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा भाग म्हणजे कीर्तनात्मक भजनातून अंधश्रध्दा निर्मूलन केले. आपल्या व-हाडी भाषेमध्ये सहज विनोदाची,संवादाची पेरणी करत आणि जगण्यातील विसंगती मांडत त्यांनी कर्मकांडावर हल्ला केला.त्यांचे कीर्तन म्हणजे विवेचनकार आणि श्रोते यांच्यातील प्रश्नोत्तराचा सुलभ सादरीकरणाचा प्रबोधनात्मक अविष्कार होता.या अशिक्षित माणसाच्या कीर्तनाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून आचार्य प्र.के. अत्रे, पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या विद्वानांनी खाली बसून रसग्रहण केले.साध्या सोप्या शब्दांमध्ये ते विवेचन करायचे.त्यांच्या विवेचनाला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाचे पार्श्वगायन असायचे. विशेष म्हणजे संपूर्ण श्रोते भजन गायनात सहभागी व्हायचे.समाजाच्या अंधश्रद्धा, चाली, रुढी ,परंपरा यावर तुटून पडण्याच्या त्यांच्या आक्रमक शैलीचे वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी म्हटले होते सिंहाला पहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पहावे कीर्तनात..



भारतीय संत परंपरेतील क्रांतिकारक विचार मांडणाऱ्या संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंग आणि दोह्यांचा अचूक वापर ते त्यांच्या कीर्तनात करायचे मुला-मुलींच्या जन्मासाठी मुक्या असाह्य प्राण्यांची हत्या करून नवस फेडणे आणि त्यासाठी कर्ज काढणे अशा रूढींवर ते आक्रमणपणे प्रहार करायचे. तुकोबारायांच्या अभंगांचा वापर करताना ते म्हणायचे

नवसे कन्या पुत्र होती
मग का करणे लागे
पती

किंवा

पिंडदानासारख्या अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना कीर्तनात कबीराचे दोहे वापरायचे

जीते बाप को रोटी ना दे
वह मरे बाद पछताए
मुठ भर चावल लेकर
कौवा को बाप बनाएं

उठ सूट शेंदूर पासून देव बनवणे. पुढे त्याचे मंदिर घडविणे आणि कर्मकांडात समाजाला बुडविणे याला विरोध करताना ते म्हणायचे

जत्रा मे पत्रा बिथाया तीर्थे बनाया पानी
भई दुनिया बड़ी दिवानी ये तो पैसे की धुलधानी

त्यांचे समाजप्रबोधनाचे विचार त्या काळातील भारतीय ग्रामीण जीवनाची परिस्थिती बदलण्याचा क्रांतीकारी प्रयत्न होते. त्या काळात भारतीय ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, नशा,धर्मभेद,प्राण्यांचे बळी, जातीभेद,अस्पृश्यता,हुंडा पद्धती आणि निरक्षरता या सर्व सामाजिक बंधनांनी लोकांचे मन जड झालेले होते. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनात अंधश्रद्धा, देव-धर्मा विषयी चुकीचे विश्वास आणि सार्वजनिक अस्वच्छते विरुद्ध आघात केला.

गाडगेबाबांचे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते. त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांसोबत मिळून रस्ते, सार्वजनिक जागा, मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे.याच ठिकाणी त्यांनी धर्मशाळा, आश्रम शाळा, नद्यांचे घाट, पाणपोया, गोरक्षण उघडले. स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता सुरू व्हायची.त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा म्हणून होता.

कीर्तनाचा प्रारंभ हा स्वच्छता अभियानातून करणारा हा महापुरुष तत्कालीन समाज व्यवस्थेत धार्मिक पाखंडावर आसूड उमटवायचा.मंदिरात देव शोधणे ऐवजी माणसातच देव शोधा हा त्यांचा परखड संदेश होता. देव दगडात नाही तो माणसात आहे, असे ते देवकीनंदन गोपाला हे भजन गाताना उदाहरणे देऊन व श्रोत्यांशी संवाद साधून ते स्पष्ट करायचे.

गाडगेबाबांनी फक्त भाषण किंवा कीर्तनाचाच अवलंब केला नाही, तर त्यांनी आपल्या कमाईतून आणि लोकांच्या देणगीतून अनेक धर्मशाळा, अन्नछत्र, वृद्धाश्रम, गोशाळा आणि रुग्णालय परिसरात धर्मशाळा उभारल्या.मुंबई ,पंढरपुर, नाशिक, पुणे, आळंदी, देहू आणि अमरावती येथे त्यांच्या पुढाकारात धर्मशाळा उभारल्या गेल्या. मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल धर्मशाळा (१९५४) सारख्या सामाजिक उपक्रमांत त्यांनी योगदान दिले.मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील तमाम गरीब बांधवांसाठी राहण्याची सोय त्यांनी त्या काळात केली.अनेक ठिकाणी निवारे ,धर्मशाळा उभारून गरीब, दलित आणि गरजू लोकांना संरक्षण मिळवून दिले.मानवा मानवातील भेद दूर करत सहजीवनाचा आदर्श दिला.

जातीपाती,अस्पृश्यता,अज्ञानात खितपत पडलेल्या ग्रामीण जनतेला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याच भाषेत समाज प्रबोधन केले. लोकांना जात-पात, सामाजिक भेदभाव,अस्वच्छता यातून बाहेर काढत कर्मातून आयुष्य घडवण्याची शिकवण दिली. संवादावर त्यांचा विश्वास होता.शिक्षणातूनच सामाजिक सुधारणा होऊ शकते हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना तत्कालीन समाज व्यवस्थेत रुजविण्याचे कार्यही त्यांनी स्वतः केले.शिक्षणाने माणूस किती मोठा होतो यासाठी ते बाबासाहेबांचे उदाहरण समोर बसलेल्या जनतेला द्यायचे.जातीभेदात, चातुर्वर्णात डुंबलेल्या तत्कालीन समाज व्यवस्थेला बाहेर काढण्यासाठीच्या त्यांच्या धडपडीचे बाबासाहेब आंबेडकरांनी देखील कौतुक केले. गाडगेबाबांच्या समाज आणि जातीभेदाविरुद्धच्या कार्याचे महत्त्व बाबासाहेबांनी मान्य केले.गाडगेबाबा त्या काळातील काही थोर व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधणारे व्यक्ती होते. त्यांच्या कार्याला प्रेरणा आणि समन्वय दोन्ही मिळाले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी गाडगेबाबांच्या मैत्री आणि आदराचे संबध होते.भाऊरावांच्या शिक्षण व सामाजिक कार्याचा उल्लेख ते आपल्या कीर्तनात करायचे. भाऊरावांनी गाडगेबाबांच्या निधनावरअतिशय भावनिक संवेदना व्यक्त केल्या होत्या.

डॉ. पंजाबराव देशमुख, इतिहासातील अन्य एक समाजसेवक आणि राजकीय व्यक्तिमत्त्व, यांच्या कार्यात गाडगेबाबांनी काही प्रमाणात सहकार्य केले आणि त्यांच्या योजना, शिक्षण आणि समाज सुधारणा कार्यक्रमांना पाठिंबा दिला.गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांच्या विचारधारांमध्ये सामाजिक समता, स्वच्छता आणि ज्ञानविकास अशा मुद्द्यांवर साम्य होते. साने गुरुजी यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. तर समाज सुधारक प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांच्यावर पुस्तक लिहून गाडगे बाबांच्या कार्याला जनतेसमोर आणले होते.

अंधश्रद्धा, वर्ण आणि सामाजिक कायदा

गाडगेबाबांनी अंधश्रद्धा आणि जातीवादाविरुद्ध सतत भाष्य केले. त्या काळात अनेक भोंदू बाबा, महाराज आणि तीर्थस्थळांची पूजा करून आपले जीवन सुधारेल असा विश्वास ठेवत असताना गाडगेबाबांनी हे स्पष्ट केले की खोटे देव, तीर्थक्षेत्र आणि आचार हे मानवाच्या प्रगतीत व्यत्यय आणतात.देव आणि धर्म यांच्या चौकटीत भारतीय समाज व्यवस्था रसातळाला जाईल आणि त्यातून बाहेर पडल्याशिवाय नवभारताची निर्मिती होऊ शकत नाही. हे ७५ वर्षांपूर्वी या महामानवाने गावागावातील जनतेला समजून सांगण्याचे महत कार्य केले.सामाजिक सुधारणा,सामाजिक उपाय, शिक्षण आणि मानवी मूल्यांचा अवलंब करणे अधिक परिणामकारक आहे,हे त्यांनी सामान्य माणसासोबतच व्यवस्थेला समजावण्याचे धारिष्टय दाखविले गाडगेबाबांनी आपल्या कार्याच्या शेवटच्या काळात ८ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबईत एक सार्वजनिक कीर्तन केले.गाडगे बाबांचे शेवटचे भाषण आजही सर्वत्र उपलब्ध आहे.अशिक्षित असणाऱ्या या समाजसुधारकाच्या जात, धर्म,स्वच्छता आणि शिक्षणाबाबतच्या कल्पना किती स्पष्ट होत्या. क्रांतिकारी होत्या, याची जाणीव आजही समाजाला ठेवणे गरजेचे आहे.देशाने अमृत महोत्सवी वाटचाल पूर्ण केल्यानंतरही त्यांचे विचार आजही कालसापेक्ष आहे. गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजसेवा केली.मात्र स्वतःच्या नावाने आश्रम, मठ उभारणे त्यांना मान्य नव्हते. ते स्वतः म्हणायचे मी कुणाचा गुरु नाही.माझा कुणी चेला नाही

शेवटी २० डिसेंबर १९५६ रोजी अमरावती जिल्हयातील वलगाव येथे हा महान सुधारक अंतिम प्रवासासाठी प्रस्थान करता झाला.त्यांचा वारसा आजही जिवंत आहे, महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' आणि राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार योजना सुरु केल्या आहेत. तसेच अमरावती विद्यापीठाचे नांव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ठेवण्यात आले आहे, हा . त्यांच्या कार्याचा सन्मान आहे.

**- प्रवीण टाके, उपसंचालक**
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
९७०२८५८७७७

# 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र संकल्पनेतील महत्त्वपूर्ण पाऊल - मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

युवकांचा देश असलेल्या भारतातील तरुण पिढीमध्ये जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याची क्षमता आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे 'विकसित भारत २०४७' हे स्वप्न आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला 'विकसित महाराष्ट्र'चा रोडमॅप साकार करण्यासाठी कौशल्य विकास हा पायाभूत टप्पा आहे. शासनाच्या या संकल्पनेमध्ये युवकांच्या क्षमतेचा कल जाणून घेणारी 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' योजना देशातील अशी पहिलीच सर्वेक्षण योजना असून रोजगार निर्मितीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्याने उचललेले महत्त्वाचे पाऊल राज्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

मुंबईतील वांद्रे, खार, सांताक्रुझ पश्चिम भागातील (एच पश्चिम वॉर्ड) सुमारे ५५ हजार घरांतील युवकांचा कौशल्य क्षमता कल जाणून घेण्यासाठी सुरू होत असलेल्या 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' योजनेचे उद्घाटन पालकमंत्री ड. शेलार यांच्या हस्ते झाले. त्यांच्याच संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले हे सर्वेक्षण मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि कौशल्य विकास विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. वांद्रे पश्चिम येथील नॅशनल कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या योजनेच्या उद्घाटन समारंभास स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह कौशल्य विकास उपायुक्त आनंद माळी, राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेचे विभागीय संचालक सी.एस. मूर्ती, कौशल्य विकास विभाग मुंबईचे उपायुक्त सचिन जाधव, सहायक आयुक्त शैलेश भगत, नॅशनल कॉलेजच्या प्राचार्य नेहा जगतियानी, जिल्हाधिकारी कार्यालय आणि कौशल्य विकास विभागातील अधिकारी, उद्योजक, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री ड. आशिष शेलार म्हणाले, भारताकडे लोकसंख्येचे सामर्थ्य आहे. युवकांना योग्य दिशा, कौशल्यविकास आणि रोजगार निर्मितीची संधी मिळत असल्याने भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करू शकतो. 'सक्षम कौशल्य सर्वे क्षण' हा युवकांच्या क्षमता आणि कौशल्य कल जाणून घेण्यासाठीचा देशातील पहिला उपक्रम आहे. एआय-आधारित आणि पारदर्शक पद्धतीने १८ ते ४० वयोगटातील युवकांचा सर्वेक्षणाद्वारे डेटा संकलित करुन त्याआधारे युवकांची कौशल्ये ओळखून त्यांना प्रशिक्षण संस्थांशी जोडले जाईल. या सर्वेक्षणानंतर २०२७ पर्यंत सुमारे १५ हजार युवकांना प्रशिक्षण देण्याचा आणि त्यापैकी पाच हजार युवकांना रोजगार किंवा उद्योजकतेच्या माध्यमातून स्वावलंबी करण्याचा संकल्प आहे. यासाठी उद्योग, विविध कंपन्या आणि कॉर्पोरेट क्षेत्राशी समन्वय साधून रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी साखळी व्यवस्था उभी केली जाईल. यासाठी शासनाबरोबरच महाविद्यालयांनी आणि युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन पालकमंत्री ड. शेलार यांनी केले.



जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी युवकांना मुंबईत विविध क्षेत्रात मोठी संधी असल्याचे सांगून त्यांचा कल जाणून प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले तर ते रोजगार आणि स्वयंरोजगार क्षेत्रात मोठे योगदान देऊ शकतील, असा विश्वास व्यक्त केला. पुढील दोन ते तीन महिन्यात राबविण्यात येणारे सर्वेक्षण, युवकांच्या कलानुसार प्रशिक्षण आणि रोजगार अथवा स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन या तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येईल देशातील या पहिल्या सर्वेक्षण योजनेमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय आणि कौशल्य विकास विभागाबरोबरच उद्योग, कामगार, महानगरपालिका, बचतगट, विविध क्षेत्रातील उद्योजक यांचा महत्त्वपूर्ण सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांचा कल विचारात घेऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने महाविद्यालये, नागरिक आणि युवकांनी यामध्ये सक्रीय सहभाग घेऊन ही योजना यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कटियार यांनी केले.

'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' योजनेच्या 'सक्षम युवक, सक्षम राज्य' या लोगोचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध उद्योजकांसमवेत प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीबाबत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्यातील पश्चिम विभागीय कौशल्य स्पर्धेतील (राष्ट्रीयस्तर) विजेत्या विध्यार्थांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या वतीने सहायक आयुक्त शैलेश भगत यांनी आभार मानले.

सक्षम कौशल्य सर्वेक्षण योजनेविषयी

सक्षम कौशल्य सर्वेक्षण योजनेचा उद्देश हा १८-४० वयोगटातील पुरुष व महिला उमेदवारांचा कल (interest) लक्षात घेऊन संबंधित उमेदवारांना प्रशिक्षणाअंती रोजगारक्षम बनविणे हा आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यात सापिओ नालायटीक या संस्थेद्वारे एच पश्चिम वार्डातील जवळपास ५५ हजार घरी भेट आणि एआय आधारित सर्वेक्षण करण्यात येईल. सर्वेक्षणांतर्गत प्रत्येक घरातील उमेदवारांची विहित नमुन्यामध्ये माहिती जमा करण्यात येईल.

विशेषतः १८-४० वयोगटातील पुरुष व महिला उमेदवारांचे शिक्षण व रोजगार मिळवण्याकरीता आवश्यक असलेले कौशल्य प्राप्त करण्याचा कल जाणून घेण्यात येईल. संबंधित उमेदवारांना शासनाद्वारे मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाची माहिती देण्यात येईल व त्या अनुषंगाने उमेदवारांचा कौशल्य प्राप्त करून घेण्याचा कल नोंदविण्यात येईल. उपलब्ध असलेले अधिकृत कौशल्य प्रशिक्षण संस्था त्याचप्रमाणे नजीकच्या अंतरावर उपलब्ध करुन घेण्यात येईल. उमेदवाराने कौशल्य प्रशिक्षणाकरिता दाखविलेल्या कलानुसार संबंधित अभ्यासक्रम उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण संस्थेमध्ये सुरू करण्यात येऊन याठिकाणी उमेदवारांना अभ्यासक्रमनिहाय प्रशिक्षण देण्यात येईल.

उमेदवारांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अधिकृत प्रशिक्षण संस्थेद्वारे नजीकच्या उद्योजक/ आस्थापना येथे उमेदवारांना प्रशिक्षण संस्थेद्वारे रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात येईल.

उद्योजक/ आस्थापना नोंदणी, कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, वय वर्षे १८-४० च्या उमेदवारांची नोंदणीकरिता स्वतंत्र पोर्टल/ वेबसाईट निर्माण करण्यात येईल. ज्याद्वारे या योजनेची माहिती संपूर्ण उद्योजक, प्रशिक्षण संस्था, उमेदवारांना प्राप्त होईल. कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे उमेदवाराना रोजगार किंवा स्वयंरोजगार प्राप्त करून देण्यात येईल.

# स्त्री बीज विक्रीचे रॅकेट उघड; एकाच महिलेकडून १०-१२ वेळा बीज काढल्याचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूरमधील स्त्री बीज विक्री प्रकरणातील धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. एका महिलेकडून एकदा नाही तर अनेक वेळा स्त्री बीज काढण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. तसेच एका महिलेकडून १० ते १२ वेळेस स्त्री बीज कढल्याचे देखील तपासात आले समोर आले आहे. कायदेशीर रित्या एका महिलेकडून एकदाच स्त्री बीज काढण्यात येते, मात्र एकाच महिलेकडून वारंवार स्त्री बीज घेतल्यास ते बेकायदेशीर तर आहेच पण धोकादायक देखील आहे. या स्त्री बीज देणाऱ्या महिलांना पैसे किती देण्यात यायचे ते देखील आले समोर आले आहे. एका महिलेला १८ ते २५ हजार रुपये या स्त्री बीज विक्रीतून मिळायचे, अशी सूत्रांची माहिती आहे. केवळ महाराष्ट्रात नाही तर स्त्री ब्रिज तयार झाले हे सोनोग्राफीत सिध्द झाल्यानंतर बाहेरील राज्यात त्या महिलेला पाठवून, तिचे बनवत कागदपत्रे बनवून तिचे स्त्री बीज काढण्यात येऊन त्याची विक्री करण्यात यायची, असेही समोर आले आहे. यासंदर्भात अजून एका महिलेला पोलिसांनी अटक केली असून, ही महिला उल्हासनगर येथील सोनोग्राफी सेंटर मध्ये कामाला होती, स्त्री बीज तयार आहे की नाही ते हिचं महिला सोनोग्राफी करून सांगायची. या सगळ्याचं मुख्य केंद्र नाशिक शहरात आहे, तिथल्या प्रसिद्ध खतऋ सेंटर पर्यंत या प्रकरणाचे धागेदोर पोहोचत आहे.

बदलापूरात स्त्री बीजाच्या अवैध विक्रीचं रॅकेट उघड झालं आहे. याप्रकारचं हे भीषण रॅकेट चक्र एका घरातून चालवलं जात होतं. सुलक्षणा गाडेकर या महिलेनं घरामध्ये स्त्री बीज वाढवणारी इंजेक्शन्स बेकायदेशीरपणे साठवून ठेवली होती, असा आरोप आहे. गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून हे इंजेक्शन दिलं जात होतं. त्यानंतर गर्भाशयात स्त्री बीजांची वाढ झाल्यावर संबंधित महिलांना IVF सेंटरमध्ये पाठवलं जात होतं.




तिथल्या डॉक्टरांकडून ऑपरेशन थिएटरमध्ये स्त्री बीज काढून त्यांची बेकायदेशीर विक्री केली जात होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. बदलापूर उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना सावंत यांच्या पथकानं सुलक्षणा गाडेकर यांच्या घरी धाड टाकून हे रॅकेट उघडकीस आणलं. या प्रकरणी गाडेकर यांच्यासह अश्विनी चाबुकस्वार आणि मंजुषा वानखडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे एक मोठं इंटरनॅशनल रॅकेट असण्याची शक्यता आहे.

बदलापुरातील स्त्री बीज तस्करी प्रकरणात सहभाग असलेल्या खतऋ सेंटरवर तसच सोनोग्राफी सेंटरवर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिलीय. तसंच या प्रकरणात नाशिकमधील मालती खतऋ सेंटर ठाण्यात सुरू होतं. त्या सेंटरच्या माध्यमातून हे कृत्य सुरू असल्यासही त्यांनी सांगितलय. स्त्री बीज तस्करी प्रकरणात आतापर्यंत पाच जणांना अटक करण्यात आली. या पाचही जणांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे स्वतःची ओळख लपवून स्त्रीबीजांची तस्करी केल्याचं समोर आलं आहे. तसेच हे रॅकेट बदलापूर ठाण्यापुरता मर्यादित नसून याची पाळामुळे संपूर्ण राज्यात तसच राज्याबाहेरही पसरल्याचं रूपाली चाकणकर यांनी सांगितलं. बदलापूर पोलिसांनी हे प्रकरण शोधून काढल्याबद्दल त्यांनी पोलिसांचही कौतुक केलं.

## थोडक्यात

### विरोधीपक्ष नेते साजेद यांच्यासह नगरसेवकांवर गुन्हा दाखल

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. अतिक्रमण कारवाईला विरोध करणाऱ्या विरोधीपक्ष नेत्यासह एमआयएमच्या१४ नगरसेविक आणि नगरसेविकांच्या पतींवर गुन्हादाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या शहागंज भागात अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान विरोधीपक्षनेते समीर साजेद बिल्डर यांनी एमआयएमच्या नगरसेवकांसह कारवाईला विरोध केला होता. तसेच कारवाई करण्याऱ्या पथकाला पिटाळून लावले होते. त्यामुळे महानगरपालिकेच्या महिला उप-आयुक्त सविता सोनवणे यांच्या तक्रारीवरून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एमआयएमच्या नगरसेवकांच्या १४ नगरसेवकांसह ४० ते ५० जणांविरुद्ध सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पथकातील अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली, धमकी दिली आणि धक्काबुक्कीही केली. 'महानगरपालिका तुमच्या बापाची जहागीर नाही' अशा शब्दांत दमदाटी करून हातगाडी चालकांना पुन्हा अतिक्रमण करण्यासाठी भडकवले. तर कारवाईसाठी आलेले जेसीबी आणि ट्रक बळजबरीने तिथून हटवण्यास भाग पाडले आणि परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले. या सर्व कृत्याचे व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर शेअर केले, ज्यामुळे प्रशासकीय प्रतिमा मलीन केली. विकास कामास अडथळा केल्यास सदस्यत्व रद्द होवु शकते, अशी पुरेपुर माहीती असतानाही सर्व नगरसेवकांनी जाणीवपुर्वक बेकायदेशीर जमाव जमवुन सरकारी कामात अडथळा र्निमाण केला. असा गंभीर आरोप एमआयएम नगरसेवकांवर करण्यात आला आहे.

### मार्चच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा; राज्यात तापमान २ ते ४ अंशांनी वाढणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी उष्णतेची तीव्रता वाढू लागली असून मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पुढील काही दिवस राज्यातील कमाल तापमानात साधारण २ ते ४ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. बहुतांश भागात हवामान कोरडे, उष्ण आणि निरभ्र राहील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.१ मार्च रोजी राज्यात मुख्यत्वे कोरडे आणि उष्ण वातावरण राहण्याची शक्यता आहे. ढगाळ वातावरण किंवा पावसाची शक्यता अत्यल्प असून उन्हाचा चटका अधिक जाणवू शकतो.

कोकण किनारपट्टीवर उष्ण आणि दमट हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागांत उकाडा आणि आर्द्रतेचा त्रास जाणवू शकतो. मुंबई शहरात कमाल तापमान २९ ते ३२ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे तर किमान तापमान २३ ते २५ अंशांदरम्यान राहू शकते. सकाळी आणि संध्याकाळी उकाड्याची भावना कायम राहील.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर येथे हवामान कोरडे आणि उष्ण राहील. पुण्यात दिवसाचे तापमान झपाट्याने वाढताना जाणवेल तर रात्री तुलनेने थोडा गारवा जाणवू शकतो. मात्र दुपारच्या सुमारास उन्हाची तीव्रता अधिक असेल.

मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड, परभणी आणि धाराशिव या भागांत उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. येथे कोरडे वातावरण आणि वाढते तापमान यामुळे दुपारच्या वेळेत बाहेर पडताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

विदर्भात तापमानात अधिक वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि बुलढाणा येथे कमाल तापमान काही रित्या वाढण्याची शक्यता आहे.

वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी पिणे, हलके आणि सूती कपडे परिधान करणे, तसेच ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

## विद्यार्थिनीशी गैरवर्तनाचा आरोप, शिक्षक निलंबित

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेल्या १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेदरम्यान छत्रपती संभाजीनगरमधील बजाजनगर परिसरातील एका परीक्षा केंद्रावर धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. परीक्षा देण्यासाठी आलेल्या एका विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याच्या आरोपावरून संबंधित शिक्षकाला विद्यार्थिनीच्या नातेवाईकांसह संस्था चालकाने मारहाण केल्याची घटना घडली. संबंधित शिक्षक परीक्षा केंद्रावर गार्डिंगसाठी नियुक्त होता. विद्यार्थिनीशी गैरवर्तन करून तिचा मोबाईल क्रमांक घेतल्याचा तसेच वारंवार फोन करून त्रास दिल्याचा आरोप मुलीच्या नातेवाईकांनी केला आहे.



घडलेला प्रकार विद्यार्थिनीने तत्काळ घरातील व्यक्तींना सांगितला. त्यानंतर नातेवाईकांनी संस्था चालकासमोर संबंधित शिक्षकाला बोलावले. त्यावेळी त्याने चूक झाल्याचे कबूल केल्याचा दावा करण्यात येत आहे. यानंतर संतप्त नातेवाईकांनी त्याला चोप दिला. संबंधित शिक्षकाने माफी मागितल्याचीही माहिती समोर येत आहे. दरम्यान, या शिक्षकाने इतर विद्यार्थिनींनाही त्रास दिला असावा, असा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. घटनेनंतर संबंधित शिक्षकाला तत्काळ निलंबित करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर परीक्षा केंद्र परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधित विद्यार्थिनीचा जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून, इतर विद्यार्थिनींकडूनही माहिती घेतली जात आहे. गैरवर्तनाच्या आरोपांची सखोल चौकशी केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

शिक्षणसंस्थेने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत अंतर्गत चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा आणि शिस्तीबाबत अधिक दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड होणार नाही, असा दावा संस्थेकडून करण्यात आला असून दोषी आढळल्यास कडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## धुलीवंदनाच्या आनंदावर विरजण; बीड-शिरूर मार्गावर भीषण अपघातात तरुण ठार

**बीड । प्रतिनिधी**

देशभरात आज होळीच्या सणाचा उत्साह पाहायला मिळत असून घरोघरी सकाळीच होळी पेटवून पूजन करण्यात आलं. तर, संध्याकाळी गावागावात मोठ-मोठ्या होळी पेटवल्या जाणार आहेत. त्यानंतर, सर्वत्र उद्या धुलीवंदन साजरे केले जाईल, मुंबईसह मोठ्या शहरात उद्यापासूनच रंगपंचमीची धूम पाहायला मिळेल. त्याच पार्श्वभूमीवर ग्रामीण महाराष्ट्रात धुलीवंदनाची तयारी सुरू आहे. बीड  जिल्ह्यात धुलीवंदन साजरे करायला निघालेल्या तरुणांच्या कारला भीषण अपघात झाल्याने एकजण जागीच ठार झाला असून तिघे जखमी झाल्याची घटना घडली. या अपघाताच्या घटनेनं धुलीवंदन सणाला गालबोट लागलं आहे.



बीड जिल्ह्यातील बीड-शिरूर मार्गावरील रायमोह गावाजवळ कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली. कृष्णा मुळे असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव असून कृष्णा आपल्या मित्रांसोबत धुलीवंदनाचा सण साजरा करण्यासाठी वॉटर पार्कला निघाला होता. मात्र, बीड-शिरुर मार्गावर गाडीवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला पलट्या खात थेट विहिरीच्या कठड्याला जाऊन धडकली. सुदैवाने ही गाडी विहिरीत पडली नाही. परंतु या भीषण अपघातात कृष्णा मुळे हा युवक जागीच ठार झाला. तर, कारमधील प्रसाद खोले, यश पेंढारे आणि अन्य एक जण जखमी आहेत.

दरम्यान, या कारच्या पाठीमागे त्यांच्याच मित्रांची आणखी एक गाडी होती, त्यामुळे मागील कारमधील मित्रांनी जखमींना तातडीने बीड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

## जळगावमध्ये लाडकी बहीण योजनेवरून संताप

**जळगाव । प्रतिनिधी**



राज्य सरकारने राज्यात महिलांसाठी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना आणली. या लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत राज्यातील महिलांना दरमहिन्याला सरकारकडून १५०० रूपये मानधन दिले जाते. मात्र, या योजनेचा लाभ घेण्याकरिता काही नियम आणि अटीही सरकारकडून ठरून देण्यात आल्या. ज्याीवेळी ही योजना आली, त्यावेळी सरकारने महिलांनी केलेल्या अर्जांनुसार, सरसकट अर्ज मंजूर करून लाडकी बहीण योजनेचे पैसे दिले. मात्र, अनेक महिलांनी अर्ज करताना नियम आणि अटी बाजूला सारून अर्ज केले. आता महिला व बालकल्याण विभागाकडून अर्जाची छाननी बारीकपणे केली जात आहेत.

यासोबतच ईकेवायसीचीही अट ठेवण्यात आली. यादरम्यान केवाएसी करूनही लाडकी बहीण योजनेचे पैसे येत नसल्याची ओरड अनेक महिलांची आहे. ई-केवायसी करूनही लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत नसल्याने जळगावात महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयात महिलांनी गोंधळ घातल्याचे बघायला मिळाले. गोंधळ वाढल्याचे पाहून कर्मचाऱ्यांनी महिलांना कार्यालयाबाहेर काढले आणि मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावून घेतल्याचा प्रकार. महिला पैसे न मिळाल्याने गोंधळ घातल होत्या.


लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाल्याने जिल्हाभरातील वेगवेगळ्या तालुक्यांमधील महिलांनी महिला व बालकल्याण विभागाचे कार्यालय गाठत गोंधळ घातला. कार्यालयात विचारणा करण्यासाठी गेलेल्या महिलांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी अरेरावी केल्याचा आरोप महिलांनी केला आहे. दोन तास चाललेल्या या प्रकारानंतर संतप्त महिलांनी स्वतः व्हिडिओ बनवून घेत आपली व्यथा मांडून लक्ष वेधून घेतले. महिलांचे व्हिडिओ सोशल मिडिव्यावर व्हायरल झाले आहेत. मात्र, महिलांचा गोंधळ अधिक वाढल्याचे लक्षात येताच कर्मचाऱ्यांनी महिलांना कार्यालयाच्या बाहेर काढून थेट कुलूप लावले. यानंतर महिला या अधिकच संतापल्याचे बघायला मिळाले.

## कोथरुड गोळीबार प्रकरण; मकोका आरोपी अमोल लाखे अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

कोथरूड गोळीबार प्रकरणात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये म्हणजेच मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या टोळीतील फरार आरोपीला वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव अमोल दत्तात्रय लाखे, वय २७ वर्षे, रा. ईटखेडा, छत्रपती संभाजीनगर असं आहे. लाखे हा सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे लपून बसला होता. वारजे माळवाडी पोलिसांच्या पथकाने सापळा रचत त्याला बार्शीतून ताब्यात घेतलं

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि टोळीप्रमुख नीलेश घायवळ अद्याप फरार आहे. तो सध्या ब्रिटनमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसांनी ब्रिटिश उच्चायुक्तांशी संपर्क साधत पत्रव्यवहार सुरू केला आहे. कोथरूड गोळीबार प्रकरणानंतर पुणे पोलिसांनी टोळीविरोधात मकोका अंतर्गत कडक कारवाई सुरू केली असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकं कार्यरत आहेत.




कोथरूड गोळीबार प्रकरणात फरार असलेला गुंड नीलेश घायवळ हा सध्या परदेशात असून, अद्याप त्याला ताब्यात घेण्यात आले नाही. घायवळ हा सध्या ब्रिटनमध्ये असल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसंनी ब्रिटीश उच्चायुक्तांशी संपर्क पत्रव्यवहार करण्यात आले आहे. खंडणी प्रकरणात घायवळ टोळीविरुद्ध वारजे पोलिसांनी 'मकोका' कायद्यान्वये कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणात अमोल लाखे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल केल्यानंतर तो पसार झाला होता. लाखे हा बार्शी परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे यांना मिळाली. त्यानंतर त्याला सापळा लावून ताब्यात घेण्यात आले.

१७ सप्टेंबर रोजी रात्री पावणेबाराला पुण्यातील कोथरूड परिसरामधील मुठेश्वर चौकात घडली होती, तक्रारदार मित्रांसमवेत गप्पा मारत असताना, घायवळ टोळीतील गुंड दुचाकीवरून जात होते. त्यांना जाण्यासाठी रस्ता न दिल्याच्या किरकोळ कारणांवरून भांडणे झाली. त्यातून आरोपींनी धुमाळ यांना मारहाण केली. त्यापैकी एकाने त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला. त्यानंतर काही वेळाने आरोपींनी सागर कॉलनी परिसरात वैभव साठे याच्यावर कोयत्याने वार केले. आम्ही या भागाचे भाई आहोत, असे म्हणून आरोपींनी दहशत माजवली, असे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी घायवळ टोळीच्या सदस्यांसह टोळीच्या म्होरक्यावरती देखील मकोका अंतर्गत कारवाई केली. यादरम्यानच्या तपासात टोळीप्रमुख निलेश घायवळ फरार असून, तो परदेशात पळून गेला असल्याचं समोर आलं. त्याच्याविरोधात लूक आऊट नोटीस काढली आहे. त्याच्या अटकेसाठी पासपोर्ट रद्द करण्याचा न्यायालयाने आदेश द्यावा, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली.

## खंडोबा मंदिरातील शिवलिंग चोरी, ग्रामस्थांच्या सतर्कतेने शोध

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गुन्ह्यांचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. चोरी, दरोड्याच्या घटना आपण ऐकत असतोच. पण पुण्याजवळ नुकताच असा प्रकार घडला ते ऐकून सगळेच हादरले. एका अज्ञात चोरामुळे मंदिरातील देवांनांही धक्का बसला. अज्ञात इसमाने चक्क मंदिरातील शिवलिंगच चोरी केल्याचा भयाक प्रकार समोर आला आणि गावकरी हैराण झाले. पांडवकालीन शिवलिंगाची अज्ञात व्यक्तीने तोडफोड करून चोरी करण्यात आली होती. मात्र सतर्क ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने त्या शिवलिंगाचा शोध घेण्यात यश मिळालं. या संपूर्ण घटनेची सध्या सगळीकडे चर्चा सुरू आहे.

पुण्यातील मुळशी तालुक्यातील मुलखेड-घोटावडे परिसरात ही धक्कादायक घटना घडल्याचं समोर आलं होतं. दुर्गम डोंगरावर वसलेल्या खंडोबा मंदिरातील पांडवकालीन शिवलिंगाची, अज्ञात व्यक्तीने तोडफोड केली आणि चोरी केल्याचा प्रकार उघड झाला. मात्र ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे आणि पोलिसांच्या मदतीने हे शिवलिंग मंदिर परिसरातच सापडलं.



पुण्यातील मुळशी तालुक्यातील मुलखेड गावात हा प्रकार घडला. तेथे सुमारे १७०० ते १८०० मीटर उंचीवर वसलेलं हे खंडोबा मंदिर आहे. जंगलातील खडतर रस्ता पार केल्यानंतरच या मंदिरात पोहोचता येतं. आणि याच मंदिरात पांडवकालीन शिवलिंग स्थापित आहे. मात्र एका अज्ञात चोरट्याने मंगळवारी रात्री या शिवलिंगाची तोडफोड केली आणि ते चोरी केल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले. विशेष म्हणजे ही घटना घडून तब्बल तीन दिवस झाले, तरीही ग्रामस्थांना याची कल्पनाही नव्हती. ते शिवलिंग जिथे होतं, त्या ठिकाणी दगडी कुंडी ठेवण्यात आली होती. त्यामुळे शिवलिंग चोरीला गेलंय हे नागरिकांना समजलंही नाही.

मात्र जेव्हा हा प्रकार लक्षात आला, तेव्हा गावात एकच खळबळ उडाली. शिवलिंगद चोरीला गेल्या सगळेच हादरले. त्यानंतर ग्रामस्थ एकत्र आले आणि त्यांनी शुक्रवारी पौड पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. यामागे माथेफिरू व्यक्ती असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला होता.

ग्रामस्थांची तक्रार मिळताच पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आणि घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. शनिवारी ग्रामस्थ आणि पोलिसांनी, या संपूर्ण डोंगर परिसरात सर्च ऑपरेशन राबवलं. बराच काल शोध सुरू होता. अखेर त्या डोंगराच्या पायथ्याशीच हे शिवलिंग सापडलं, त्यामुळे सर्वांचाच जीव भांड्यात पडला.

चोरीला गेलेल हे शिवलिंग सापडल्यामुळे परिसरातील तणाव काही प्रमाणात निवळला. मात्र असं असलं तरीही चोरीच्या या घटनेमागे नेमकं कोण आहे, याचा तपास सुरू आहे. अज्ञात चोरटा अद्याप फरार असून पोलीसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे. अतिशय दुर्गम भागातील या ऐतिहासिक मंदिरात घडलेल्या, चोरीच्या घटनेमुळे सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आता आरोपी चोराला अटक कधी होते, याकडेच सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## कॅनडाचे प्रधानमंत्री व त्यांचे शिष्टमंडळ यांचे मुंबईहून प्रयाण




**मुंबई । प्रतिनिधी**

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी त्यांची पत्नी डायना फॉक्स कार्नी व त्यांचे शिष्टमंडळ यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथून विमानाने दुपारी ४.४० वाजता प्रयाण झाले.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी हस्तांदोलन करून त्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी, सौरभ कटियार आदी मान्यवर उपस्थित होते.

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी त्यांची पत्नी डायना फॉक्स कार्नी यांनी शिष्टमंडळासमवेत दिल्ली येथे प्रयाण केले.

## संक्षिप्त

### ‘उमेद’च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्यात येणार - पालकमंत्री जयकुमार गोरे

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. ‘उमेद’च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या माध्यमातून सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्याची ग्वाही ग्रामविकास व पंचायतराजमंत्री पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

नॉर्थ कोर्ट मैदान येथे ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित रुक्मिणी महोत्सव व मिनी सरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन या कार्यक्रमाचे पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, यावेळी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा परिषद सदस्य चेतन केदार ,नगरसेविका रोहिणी तडवळकर, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा श्री. जगताप आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, महिला बचत गटांनी स्वतः उत्पादित केलेल्या मालांचे वस्तूचे विक्री व प्रदर्शन करण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून हा मिनी सरस जिल्हा रुक्मिणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महिलांची आर्थिक बळकटी व सक्षमीकरणासाठी हा महोत्सव घेण्यात येतो. उमेद च्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील महिला स्वतः च्या पायावर उभ्या राहाव्या, त्यांना मानाने, सन्मानाने जगता यावे त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी उमेदच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात, असे त्यांनी सांगितले. तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून नवनवीन मोठे उद्योग महिलांनी निर्माण करावे, तसेच प्रत्येक गावागावांमधून महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक गावी एक प्रभाग संघ निर्माण व्हावे अशी भूमिका ठेवून आपण सर्वांनी काम करावे. गावातील दूध व्यवसाय करणाऱ्या महिलांनी स्वतः ची दूध बँक तयार करावी. शेळ्या, मेंढ्या व गाई पालन हा व्यवसाय सर्वात जास्त पैसा मिळवून देणारा ग्रामीण भागातील व्यवसाय आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या मालाला चांगले पॅकिंग केले तर चांगला पैसा मिळतो. महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी उमेद मॉल मंजूर केला गेला आहे, अशी ही माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली. उमेद मॉल मुळे सोलापूर जिल्ह्यातील महिलांच्या उत्पादित वस्तूंसाठी बारा महिने हक्काची बाजारपेठ मिळणार आहे . राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यात मुख्यमंत्री महोदयांनी असे मॉल मंजूर केले आहेत. तसेच गावांमध्येमहिला बचत गटाच्या बैठकीसाठी हक्काचे कार्यालय निर्माण करून देण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे सादर केला जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

उद्घाटनानंतर महिला बचत गटांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये महिला स्वयंसहायता समूहांना समुदायिक गुंतवणूक निधी ३२ कोटी ९ लाख ४० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला, तसेच महिला स्वयं सहायता समूह बँक कर्जवाटप २ कोटी २५ लाख रुपयांचा धनादेश वितरित करण्यात आला. उमेद अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील पहिल्या महिला फेडरेशनच्या नोंदणी पत्राचे वितरण करण्यात आले. सन २०२५ - २६ अंतर्गत वार्षिक कृती आराखडा मधील सर्व उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल प्रत्येक तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचा प्रमाणपत्र देऊन सत्कार पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते करण्यात आला.

# सोशल मीडियावरून रचला थंड डोक्याने खुनाचा कट

**फलटण । प्रतिनिधी**

कथित गैरवर्तनाचा बदला घेण्यासाठी खोटे इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून एका तरुणाला प्रेमाच्या जाळ्यात ओढत त्याचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फलटण तालुक्यातील गोखळी येथील नीरा नदीपात्रात मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी फलटण ग्रामीण पोलिसांनी एकाच कुटुंबातील चौघांना अटक केली आहे.अंकुश नरबट राहणार माण असे मृत तरुणाचे नाव आहे. संशयितांनी महिलेच्या नावाने बनावट सोशल मीडियावरून संपर्क साधत १५ फेब्रुवारी रोजी त्याला फलटण येथे बोलावले. तातमगिरी डोंगराच्या पायथ्याशी नेऊन मारहाण केल्यानंतर त्याचा खून करून मृतदेह नीरा नदीत फेकण्यात आला.सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा छडा लावत अविष्कार भगत, श्रद्धा भगत, ज्ञानेश्वर भगत आणि अर्चना भगत यांना अटक केली आहे.

अंकुश बापू नरबट (वय २२, रा. ढाकणी, ता. माण, जि. सातारा), असे खून झालेल्या तरुणाचे तर आविष्कार ज्ञानेश्वर भगत, श्रद्धा आविष्कार भगत, ज्ञानेश्वर भरतराव भगत, अर्चना ज्ञानेश्वर भगत (चौघे रा. पिंप्रद, ता. फलटण, जि. सातारा), अशी पोलिसांनी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. अंकुश नरबटच्या डोक्यावरील जखमांमुळे पोलिसांना संशय आला. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला.

तपासात निष्पन्न झाले की, कथित गैरवर्तनाचा बदला घेण्यासाठी खोटे इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून एका तरुणाला प्रेमाच्या जाळ्यात ओढत त्याचा



खून करण्यात आला. बदला घेण्याच्या उद्देशाने त्यांनी खुनाचा कट रचला. महिलेच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम खाते उघडून अंकुशला प्रेमाच्या जाळ्यात ओढले व त्याला फलटण येथे बोलावण्यात आले. १५ फेब्रुवारी रोजी अंकुश फलटण येथे आल्यानंतर संबंधित महिलेने त्याला एकांतात वेळ घालवण्याच्या बहाण्याने तातमगिरी डोंगराच्या पायथ्याशी नेले. त्याठिकाणी कटानुसार इतर चार आरोपी वेगवेगळ्या वाहनांतून आले. त्यांनी अंकुशला मारहाण करून वाहनात टाकले व पिंप्रद येथील निर्जनस्थळी नेले. तेथे त्याचा खून करून मृतदेह गोखळी हद्दीतील नीरा नदीत फेकून दिला.

पुरावे तपासल्यानंतर गुन्हा उघडकीस आला, हा खून अत्यंत थंड डोक्याने व नियोजनबद्ध पद्धतीने केल्यामुळे सुरुवातीला पोलिसांकडे कोणतेही ठोस धागेदोरे नव्हते. मात्र, पोलिसांनी फलटण ते दहिवडी मार्गावरील हॉटेल्स, दूध डेअरी व पेट्रोल पंप येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. आरोपी व मृतक यांच्या मोबाइल ३ क्रमांकांची तांत्रिक माहिती मिळवून त्याआधारे पुराव्यांची साखळी जोडत गुन्हा उघडकीस आणला. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.

# कुलस्वामिनी कलाकेंद्रावर मध्यरात्री राडा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील धुळे सोलापूर रस्त्यावरील थापटी तांडा येथील कला केंद्रावर मध्यरात्री जोरदार राडा झाला आहे. एका जमावाने कला केंद्रावरील खुर्च्या, काचा व इतर वस्तूंचे मोठ्या प्रमाणात केले आहे. कुलस्वामिनी कलाकेंद्रात झालेल्या या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यामुळे हे कला केंद्र बंद करावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



कुलस्वामिनी कलाकेंद्रात घडलेल्या या घटनेमुळे गावकऱ्यांनी हे केंद्र बंद करण्याची मागणी केली आहे. गावकऱ्यांनी म्हटले की, कला केंद्रावर येणारे ग्राहक धिंगाणा घालत असल्यामुळे गावकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. यामुळे महिला व शाळकरी मुलींना त्रास सहन करावा लागत आहे. हे कला केंद्र बंद व्हावे यासाठी गावकऱ्यांनी अनेक वेळा आंदोलन केले आहे. काल जो कला केंद्रावर राडा झाला, वाद झाला, तोडफोड झाली याच्याशी गावातील लोकांचा काही संबंध नाही अशी माहितीही रजापूर, देगाव व थोपटी तांडा येथील ग्रामस्थांनी दिली आहे. आता हे कला केंद्र बंद न केल्यास आम्ही उपोषण करून असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

या घटनेवर बोलताना कुलस्वामिनी कला केंद्राचे मालक दादाराव मुसळे यांनी म्हटले की, ‘बाहेर दोन मुलांचा वाद झाला आणि एक मुलगा कलाकेंद्र घुसला, आमच्या मॅनेजरने त्याला बाहेर काढलं. त्यानंतर बाहेरच्या काही मुलांनी त्यांचा व्हिडिओ काढण्याचा प्रयत्न केला. हा व्हिडिओ व्हायरल होईल त्यामुळे त्याला मारहाण देखील करण्यात आली. नंतर मारहाण झालेल्या मुलाने गावात जाऊन सांगितलं आम्हाला कला केंद्रवाल्यांनी मारहाण केली, त्यामुळे गावातल्या जमावाने येऊन आमच्या कला केंद्राची तोडफोड केली.

पुढे बोलताना दादाराव मुसळे म्हणाले की, कलाकेंद्रातील कलाकार महिलांना गावकऱ्यांनी त्रास दिला नाही, मात्र आमचे नुकसान केले. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात कला केंद्र आहे. आमच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे. त्यांनी ऐकून घेतलं पाहिजे, काही गोष्टी घडल्या असतील मात्र जमावाने येऊन असं करणं कितपत योग्य आहे. कलाकारांच्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न आहे, त्यांच्यासाठी आम्ही हे उदरनिर्वाहाचे साधन तयार केले आहे. काही गोष्टी बाहेर जरी घडल्या तरी कला केंद्रावर येत आहेत.

# साखर घाटी होळीच्या निमित्तानं बाजारात दाखल; शहरातील बाजारपेठेत सणाची लगबग

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी होळी सणाच्या पार्श्वभूमीवर घनसावंगी शहरातील बाजारपेठांमध्ये सणाची चांगलीच लगबग सुरू झाली आहे. विविध प्रकारच्या साखर घाटी, रंगीबेरंगी पिचकाऱ्या, गुलाल, विविध रंग तसेच होळी साजरी करण्यासाठी लागणारे इतर साहित्य मोठ्या प्रमाणावर बाजारात दाखल झाले आहे. सण जवळ येत असल्याने खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढताना दिसून येत आहे.

विशेषतः लहान मुलांसाठी आकर्षक आकारातील व वेगवेगळ्या डिझाइनच्या पिचकाऱ्यांना मोठी मागणी आहे. त्याचबरोबर पारंपरिक होळीचा अविभाज्य भाग असलेल्या साखर गाठी विविध आकारांत व आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध झाल्याने ग्राहकांचा ओढा वाढला आहे.

यंदा पर्यावरणपूरक व त्वचेस सुरक्षित असलेल्या रंगांची मागणी वाढलेली दिसून येत आहे. केमिकलयुक्त रंग टाळून नैसर्गिक रंगांचा



वापर करण्याकडे नागरिकांचा कल वाढत असून व्यापाऱ्यांनीही अशाच प्रकारचे रंग विक्रीस ठेवले आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही होळीच्या आधीच्या आठवड्यात बाजारपेठेत विशेष गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

व्यापाऱ्यांच्या मते, मागील काही दिवसांपासून विक्रीत सातत्याने वाढ होत असून येत्या दोन-तीन दिवसांत खरेदीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत चैतन्य निर्माण झाले असून शहरातील मुख्य बाजारपेठा, गल्लीबोळ तसेच फूटपाथवरील दुकानांमध्येही होळी साहित्याने रंगत आली आहे.

# रामगव्हान जि.प.शाळेतील मुलांचा ‘जल्लोष’, वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**घनसावंगी । प्रतिनिधी**

वार्षिक स्नेहसंमेलन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा उत्सव आहे. अशा कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास वाढतो आणि व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी अंकुश राखुंडे यांनी केले.ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामगव्हाण खु. येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलत होते.



स्नेहसंमेलनासारख्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, वक्तृत्व व सादरीकरण कौशल्य विकसित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करावे.स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, समूहगीत, एकांकिका, देशभक्तीपर नाट्यछटा, विनोदी सादरीकरण आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः लहान विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली.कार्यक्रमाच्या शेवटी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पालकांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत शिक्षकवृंदाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# विरह सहन झाला नाही; पतीच्या पाठोपाठ पत्नीनेही सोडला जीव

**तुमसर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील एका छोट्याशा गावात घडलेली ही हृदयद्रावक घटना आज संपूर्ण परिसराला भावुक करून गेली आहे. आयुष्यभर एकमेकांच्या साथीने चाललेले वृद्ध दांपत्य मृत्यूनंतरही एकमेकांपासून वेगळे झाले नाही. दोघांचाही एकाच दिवशी मृत्यू झाला आणि एकाच सरणावर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने गावकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले. तसेच सर्वत्र या वृद्ध दांपत्याची चर्चा सुरु आहे.

तुमसर तालुक्यातील सोरना गावात राहणारे लखाराम सिताराम शहारे (वय ८६) आणि जैतुराबाई लखाराम शहारे (वय ८०) हे दांपत्य कष्टाळू आणि साधे जीवन जगत होते. दशकांपूर्वी सुरू झालेल्या त्यांच्या नात्यात सुख-दुःखाची वाटणी, परस्पर समजूतदारपणा आणि कुटुंबासाठी केलेले त्याग यामुळे ते गावात आदराचे ठिकाण होते. वृद्धापकाळातही एकमेकांची



काळजी घेणारी ही जोडी अनेकांसाठी आदर्श ठरली होती. काळाच्या चक्राने प्रथम लखाराम शहारे यांचा निरोप झाला. घरातील मुख्य आधार गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. नातेवाईक, शेजारी आणि गावकरी शोक व्यक्त करत असतानाच जैतुराबाईंना सर्वांत मोठा धक्का बसला. ज्यांच्यासोबत आयुष्यभर प्रत्येक क्षण जगला, त्यांच्या अचानक विरहाने त्यांच्या मनाला आणि शरीराला तग धरता आला नाही.

पतीचा मृतदेह घरात असतानाच जैतुराबाईंना तीव्र भावनिक धक्का बसला. शोक, आठवणी आणि एकाकीपणाचा ताण इतका तीव्र होता की, त्यांनी अवघ्या आठ तासांच्या अंतराने प्राण सोडले. एकाच दिवसात घरातील दोन मुख्य आधारस्तंभ निघून गेल्याने संपूर्ण गाव शोकाकुल झाले. ही घटना गावकऱ्यांसाठी अतिशय वेदनादायी ठरली.

जसे आयुष्यभर एकमेकांना साथ दिली, तसाच अखेरचा प्रवासही एकत्र असावा, अशी ग्रामस्थांची भावना होती. कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी एकमताने निर्णय घेत या वृद्ध दांपत्यावर एकाच सरणावर अंत्यसंस्कार केले. अंत्यविधी दरम्यान उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. मृत्यूलाही या प्रेमळ नात्याला वेगळे करता आले नाही, अशी भावना सर्वांच्या मनात घर करून गेली. ही घटना खऱ्या अर्थाने प्रेम आणि साथीच्या सामर्थ्याची साक्ष आहे.

# घरफोडी करणारा सराईत आरोपी जेरबंद

## पाच गुन्ह्यांची उकल, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील घरफोडी व चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत सराईत आरोपीस जेरबंद केले आहे. या कारवाईत पाच घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून रोख रक्कम व चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

जालना जिल्ह्यातील चोरी व घरफोडीचे गुन्हे उघड करून आरोपींचा शोध घेण्याबाबत पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तपासाची चक्रे फिरवली.

योगेशनगर येथील रमेश हिरामण वाघ यांचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी ७ हजार रुपये रोख व सुमारे ६० हजार रुपयांचे दागिने चोरुन नेले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी भारतसिंग कपुरसिंग बावरी रा. गुरुगोविंदसिंगनगर, जालना याला ताब्यात घेत त्याची चौकशी केली. त्याने चौकशीदरम्यान संबंधित गुन्ह्याची कबुली दिली.

सखोल तपासात आरोपीने आणखी चार गुन्ह्यांची कबुली दिली. यामध्ये तालुका पोलीस ठाणे हद्दीतील गोकुळधाम, इंदेवाडी पाण्याच्या टाकीजवळील घरफोडी, लक्ष्मीनगर येथील घरफोडी, राजपुतवाडी येथील लोखंडी सळई चोरी तसेच सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील जिजामाता कॉलनी येथील लोखंडी सळई चोरी या गुन्ह्यांचा समावेश आहे. हे सर्व गुन्हे त्याने फरार साथीदारासह केल्याची कबुली दिली आहे.

आरोपीच्या ताब्यातून ६ हजार रुपये रोख व अंदाजे२५ हजार रुपयांचे चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. आरोपीस पुढील तपासासाठी तालुका पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून फरार साथीदाराचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पथकातील कर्मचाऱ्यांनी केली. जिल्ह्यातील घरफोडी प्रकरणांचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

# पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकाला लुटले

## कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; लाखो रुपयाचे दागिने लंपास

**जालना । प्रतिनिधी**



पोलीस असल्याची बतावणी करून एका ७० वर्षीय सेवानिवृत्त नागरिकाला रस्त्यात अडवून त्यांच्याकडील सुमारे १ लाख ६ हजार ८७५ रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना रविवारी जुना जालना परिसरात घडली. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रमेश जगन्नाथ मेश्राम रा. सत्तकर नगर, जुना जालना हे दि. १ मार्च रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता ते रविवारी आठवडी बाजारासाठी गांधीचमन ते रेल्वेस्टेशन मार्गे गेले होते. बाजार आटोपून ते स्कुटीवरून घरी परतत असताना रेल्वेस्टेशन, जुना जालना येथील साठे नगर परिसरातील लायमर गॅरेज/वॉशिंग सेंटरसमोर ही घटना घडली. पाठीमागून आलेल्या काळ्या रंगाच्या मोटरसायकलवरील दोन अनोळखी इसमांनी त्यांची स्कुटी आडवी लावून त्यांना थांबविले. आम्ही पोलीस आहोत, गाडीची झडती घ्यायची आहे, असे सांगत त्यांनी स्कुटी रस्त्याच्या कडेला लावण्यास भाग पाडले. त्यानंतर स्कुटीची डिकी तपासून संबंधित इसमांनी मेश्राम यांच्या बोटातील दोन सोन्याच्या अंगठ्या व गळ्यातील सोन्याची चेन काढून देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांना धमकावून एकूण अंदाजे १ लाख ०६ हजार ८७५ रुपयांचा ऐवज आरोपींनी लंपास केला.

घटनेनंतर मेश्राम यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. अज्ञात दोघांविरुद्ध संगनमताने फसवणूक व धमकी देत लूट केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस सीसीटीव्ही फुटेज व अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेत आहेत.

दरम्यान, पोलीस असल्याची बतावणी करून वाहनचालकांना अडविणाऱ्या संशयित व्यक्तींविषयी नागरिकांनी सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींना दागिने अथवा मौल्यवान वस्तू देऊ नयेत आणि तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**